महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : ३३७ वा | दिनांक : २०/११/२०२५ | वार : गुरूवार

## चळवळीतील कार्यकर्त्यांची धरपकड म्हणजे पोलिसांच्या उलट्या बोंबा : राजू शेट्टी



**कोल्हापूर :** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पोलिसांकडून सुरू असलेल्या कार्यकर्ते आणि शेतकऱ्यांच्या धरपकडीवर स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष माजी खासदार राजू शेट्टी यांनी सडकून प्रहार केला आहे. पोलिसांच्या या उलट्या बोंबा आहेत, असा हल्लाबोल शेट्टी यांनी केला. शेट्टी यांनी फेसबुक पोस्टद्वारे आपली भूमिका मांडताना म्हटले आहे की, गोध्रा हत्याकांड करणारे उजळ माथ्याने फिरत आहेत आणि चळवळीतील शेतकऱ्यांना, कार्यकर्त्यांना त्रास दिला जात आहे, या पोलिसांच्या उलट्या बोंबा आहेत.

राजू शेट्टी म्हणाले, निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शेतकरी आंदोलनात गुन्हे दाखल झालेल्या कार्यकर्त्यांवर जणू काही चोर दरोडेखोर खंडणी बहाद्दर यांच्याप्रमाणे पोलिसांमार्फत प्रतिबंधात्मक कारवाई करून दिवस दिवसभर चळवळीतील शेतकऱ्यांना व कार्यकर्त्यांना त्रास दिला जात आहे. मटका जुगार दारू, अवैधंदे यांच्याकडून हप्ते गोळा करणाऱ्या पोलिस अधिकाऱ्यांना तुम्ही काचेच्या घरात राहत आहात, लक्षात ठेवा, असा इशारा शेट्टी यांनी दिला आहे.

कोल्हापूर जिल्ह्यातील दहा नगरपालिका आणि तीन नगरपंचायतींच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याची प्रक्रिया अखेरच्या दिवशी (सोमवारी) पूर्ण झाली. उमेदवारी अर्ज भरण्यास १० नोव्हेंबरपासून सुरुवात झाली होती, आणि शेवटच्या दिवशी सदस्यपदासाठी तब्बल ६४१ आणि नगराध्यक्षपदासाठी ७३ अर्ज दाखल झाले. या निवडणुकीत २६३ सदस्यपदांसाठी एकूण १ हजार ८६७ इच्छुकांनी आपले अर्ज भरले आहेत, तर १३ नगराध्यक्षपदांसाठी १६९ जणांनी उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. गडहिंग्लज आणि हातकणंगले येथे नगराध्यक्षपदासाठी सर्वाधिक उमेदवारांनी अर्ज भरले आहेत.

अखेरच्या दिवशी उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी इच्छुकांनी मोठे शक्तिप्रदर्शन केले. आता उमेदवारी अर्ज मागे घेण्यासाठी शुक्रवार, २१ तारखेपर्यंतची मुदत आहे. माघारीनंतर निवडणुकीचे अंतिम चित्र स्पष्ट होईल.

## दोन शहरांत भाजपचा बिनविरोध विजय; निवडणूक प्रक्रियेवर नवे प्रश्नचिन्ह

**धुळे :** सोलापूर जिल्ह्यातील अनगर नगरपंचायतीनंतर आता धुळे जिल्ह्यातील दोंडाई नगरपरिषद निवडणुकीतही बिनविरोध निवड झाल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे. दोंडाई येथे भाजप नेत्या आणि राज्याचे मंत्री जयकुमार रावल यांच्या मातोश्री नयन कुवर रावल या नगराध्यक्षपदी बिनविरोध निवडून येणार असल्याचे अधिकृतपणे निश्चित झाले आहे. कारण, महाविकास आघाडीच्या उमेदवार शरयू भावसार यांचा उमेदवारी अर्ज छाननी प्रक्रियेत अवैध ठरवण्यात आला. याचबरोबर दोंडाई नगरपरिषदेसाठी भाजपचे सात उमेदवारही कोणतीही स्पर्धा न राहता बिनविरोध विजयी झाले आहेत. त्यामुळे दोंडाई नगरपरिषद पूर्णपणे भाजपच्या ताब्यात जाणार हे निश्चित झाले आहे.

दोंडाई नगराध्यक्षपदासाठी भाजपची उमेदवारी नयन कुवर रावल यांच्या नावाने दाखल करण्यात आली होती. त्यांच्यासमोर राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या शरयू भावसार यांनी उमेदवारी दाखल केल्याने दोन्ही गटात थेट सामना अपेक्षित होता. मात्र छाननी दरम्यान शरयू भावसार यांचा अर्ज तांत्रिक त्रुटीमुळे अवैध ठरवण्यात आला. निवडणूक निर्णय अधिकारी शरद मंडलिक यांनी याबाबत माहिती देत, अर्जातील तांत्रिक कारणास्तव तो ग्राह्य धरता येत नसल्याचे स्पष्ट केले. परिणामी नयन कुवर रावल यांची बिनविरोध निवड जवळपास आपोआप निश्चित झाली आणि भाजपला आणखी एक मोठे यश मिळाले.

# मालेगाव अत्याचार प्रकरणाने महाराष्ट्र हादरला

**नाशिक :** जिल्ह्यातील मालेगाव येथील डोंगराळे येथे ३ वर्षांच्या चिमुरडीवर झालेल्या अत्याचार व खुनाच्या घटनेमुळे भाजप नेत्या चित्रा वाघ यांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे. पीडित कुटुंबीयांची भेट घेतल्यानंतर माध्यमांशी बोलताना वाघ यांनी, जर समोर असता तर उभा कापून काढला असता, अशा शब्दांत त्यांनी संताप व्यक्त केला आहे. पीडित कुटुंबासोबत संपूर्ण महाराष्ट्र उभा आहे आणि आरोपीला कायद्याच्या चौकटीत राहून फाशीची शिक्षा होईल, असा विश्वास वाघ यांनी यावेळी व्यक्त केला. दरम्यान, पीडित चिमुकलीच्या कुटुंबीयांनी चित्रा वाघ यांच्यासमोर टाहो फोडताच, चित्रा वाघ यांनाही अश्रू अनावर झाल्याचे हृदयद्रावक दृश्य यावेळी पाहायला मिळाले.

यावेळी बोलताना चित्रा वाघ म्हणाल्या, कुठल्या शब्दाने सांत्वन करू, तीन-साडेतीन वर्षाच्या निरागस मुलीवर राक्षसी प्रकार झाला. या घटनेमुळे प्रत्येक आईचे काळीज रडत असेल, अत्याचार करुन राक्षसी पद्धतीने तिची हत्या करण्यात आली. मी एक आई, एक महिला आणि या राज्याची मुलगी म्हणून सांगते कायद्यात तरतूद राहिली असती तर त्या हरामखोर सैतानाला चौकात आणून उभा चिरला असता.

मरेपर्यंत फाशी व्हायला पाहिजे

प्रचंड जनप्रक्षोभ आहे, या हरामखोराला फाशी व्हायला हवी. घटना घडल्याच्या दिवसापासून मुख्यमंत्री यावर लक्ष ठेवून आहेत. एकही छोट्यातल्या छोटा पुरावा सुटता कामा नये, या सैतानाला फाशीची शिक्षा व्हावी यासाठी सर्वजण प्रयत्न करीत आहोत. यांना ठेचून काढणे ही काळाची गरज आहे. अर्ध्या तासामध्ये पोलिसांनी त्याला शोधून काढला, त्याच्यावर कठोरात कठोर कारवाई व्हावी, मरेपर्यंत फाशी व्हायला पाहिजे. पालक म्हणून आपणही जागरूक राहणे आवश्यक आहे. त्याला फाशीच होणार, हा देवा भाऊंच्यावतीने मी शब्द देते, असे चित्रा वाघ यांनी म्हटले आहे.

तसेच चांगल्या वकिलाकडे ही केस द्यावी यासाठी मी उद्या मुख्यमंत्र्यांची भेट घेणार आहे. कायद्याच्या चौकटीत राहून जे काही याच्यात करता येईल ते सगळे प्रशासन, पोलिस करत आहेत. लवकरच चार्जशीट दाखल केली जाईल, असेही चित्रा वाघ यावेळी म्हणाल्या.

खटला फास्ट ट्रॅक कोर्टात चालवण्याची मागणी

नाशिक जिल्ह्याच्या मालेगाव तालुक्यातील डोंगराळे येथे तीन वर्षीय बालिकेचे अपहरण करून तिच्यावर लैंगिक अत्याचारानंतर खून केल्याची धक्कादायक घटना रविवारी घडली. या अमानुष कृत्याचा राज्यभरातून निषेध व्यक्त होत असून, आरोपीला तातडीने फाशीची शिक्षा व्हावी आणि खटला फास्ट ट्रॅक कोर्टात चालवावा, अशी मागणी जोर धरत आहे. या पार्श्वभूमीवर, आज भाजप नेत्या चित्रा वाघ यांनी काही प्रमुख पदाधिकाऱ्यांसह डोंगराळे येथे येऊन पीडित चिमुकलीच्या कुटुंबीयांची भेट घेत त्यांचे सांत्वन केले.

संबंधित नराधमाला फाशीची शिक्षा व्हावी, यासाठी शासन दरबारी पाठपुरावा सुरू असून हा खटला जलदगतीने न्यायालयात चालविण्यात येईल, असे आश्वासन चित्रा वाघ यांनी पीडित कुटुंबीयांना दिले. कुटुंबीयांनी वाघ यांच्याकडे न्यायाची मागणी करीत हंबरडा फोडताच, घरातील विदारक परिस्थिती पाहून चित्रा वाघ यांनाही अश्रू अनावर झाले होते.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार २० नोव्हेंबर २०२५


## इंदिरा गांधी या आतापर्यंतच्या इतिहासातील अत्यंत कणखर पंतप्रधान - प्रा. डॉ. राजाराम निगडे



**उमरगा :** तालुक्यातील गुंजोटी येथे श्रीकृष्ण महाविद्यालयात भारताच्या आयर्न लेडी इंदिरा गांधी यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. त्यावेळी ते बोलत होते.राष्ट्रीय सेवा योजना आणि सांस्कृतिक विभागाच्या वतीने आयोजित केलेल्या या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.गुलाब राठोड हे होते.प्रमुख पाहुणे म्हणून प्रा.डॉ.महादेव खोत आणि डॉ.जगदीश ननावरे यांनी आपल्या समयोचित प्रतिक्रिया नोंदवल्या .डॉ.राजाराम निगडे पुढे म्हणाले की.इंदिरा गांधी या भारताच्या पहिल्या आणि एकमेव महिला पंतप्रधान म्हणून राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय राजकारणात आपल्या व्यक्तिमत्वाचा ठसा उमटवला.पाकिस्तानशी युद्ध आणि बांगलादेशची निर्मिती यामुळे आशियाई भागातील प्रादेशिक शक्ती म्हणून भारत पुढे आला.सत्तेच्या केंद्रीकरणामुळे त्या सतत चर्चेत राहिल्या असल्या तरी आंतरराष्ट्रीय क्षेत्रात त्यांनी भारताला अत्युच्च उंचीवर नेऊन बसविले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला इंदिरा गांधी यांच्या प्रतिमेला प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले.नंतर सर्वांनी पुष्प अर्पण करून अभिवादन केले.शेवटी कार्यक्रमाच्या अध्यक्षपदावरून बोलताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.गुलाब राठोड म्हणाले की. इंदिरा गांधी या सर्वसमावेशक समाजाचे अत्यंत क्रांतिकारी प्रतिनिधित्व केल्या. आज अनेक देशात त्यांच्या राजकीय कारकिर्दीची चर्चा होते.अचूक निर्णयक्षमता हे त्यांच्या मुत्सद्दी राजकारणाचे केंद्रबिंदू राहिले.एक उत्कृष्ट महिला पंतप्रधान म्हणून त्यांचे नाव कायमच अजरामर राहील यात काही शंका नाही. आंतरराष्ट्रीय राजकारणात भारताचे एक स्वतंत्र अस्तित्व त्यांनी निर्माण केले. प्रखर राष्ट्रवाद जोपासण्यासाठी त्यांनी आपल्या जीवाचे रान केले. देशाभिमान स्वीकारला. त्यामुळेच त्यांचे भारताच्या जडणघडणीत अतुलनीय असे स्थान आहे .सबंध महिलांनी त्यांचा आदर्श घेतला पाहिजे, असे त्यांनी आवाहन केले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.भाऊसाहेब उगले यांनी केले तर आभार प्रदर्शन राष्ट्रीय सेवा योजनेच्या समन्वयक डॉ. मल्लमा आंबुसे यांनी मांडले .राष्ट्रगीता नंतर कार्यक्रमाची सांगता झाली. या कार्यक्रमाला शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### अहंकाराच्या वाऱ्यात

कामापुरता मामा तो
मनबुद्धीने कोता होता
गरज सरो न् वैद्य मरो
हाच त्याचा हेका होता

दोन पैसे हाती येता
हवेमध्ये उडत होता
माय मातीला सोडून
सैरावैरा पळत होता

अहंकाराच्या वाऱ्यात
एकटाच जळत होता
माणसाचा लेक तरी
माणुसकी विसरत होता

मरताना काय तो
पैसे वर नेणार आहे?
स्वार्थाच्या पलीकडे
कधी तो पाहणार आहे?

जगण्याचा हिशोब
कसा पैशात होणार आहे?
शेवटी प्रत्येकाची इथं
माणुसकी उरणार आहे

**ज्ञानेश्वर गायके**
कन्नड
मो. ९४०३३ ८४८८९

**एम.जे. न्युज चॅनल**

## महाराष्ट्र ज्युनिअर व्हॉलीबॉल लीग — U-१८ मुलांच्या संघासाठी ऑक्शनपूर्व निवड चाचणी

**छत्रपती संभाजीनगर (कृष्णा शिंदे) :** पुणे येथे आयोजित करण्यात येत असलेल्या महाराष्ट्र ज्युनिअर व्हॉलीबॉल लीग (Under-१८ Boys) स्पर्धेसाठी छत्रपती संभाजीनगर विभागाच्या संघासाठी ऑक्शनपूर्व निवड चाचणी खालीलप्रमाणे आयोजित करण्यात आली आहे : दिनांक : २१/११/२०२५ वेळ : दुपारी ०२:०० वाजता स्थळ : विभागीय क्रीडा संकुल, गारखेडा व्हॉलीबॉल मैदान, छत्रपती संभाजीनगर.या निवड चाचणीसाठी खेळाडूंच्या जन्मतारखा पुढीलप्रमाणे पात्र असाव्यात : Under-१८ पात्रता : ०१/०१/२००८ किंवा त्यानंतर जन्म झालेले खेळाडूच पात्र राहतील.वयाचा पुरावा म्हणून खेळाडूंनी खालील कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे :१. आधार कार्ड.२. शाळेचे बोनाफाईड.३. जन्म प्रमाणपत्र.नोट: ऑक्शनपूर्व निवड चाचणी येण्याआधी १९/११/२०२५ संध्याकाळी ०५:०० PM फोन करुण तुमची उपस्थित नंदव अन्यथा तुम्हाला प्रवेश मिळणार नाही.छत्रपती संभाजीनगर विभागातील १८ वर्षाखालील सर्व मुलांनी या निवड चाचणीमध्ये मोठ्या संख्येने सहभाग घ्यावा, असे आवाहन. *छत्रपती संभाजीनगर विभागीय सचिव (श्री. सतीश पाठक) *कार्यकारणी जालना जिल्हा अध्यक्ष (श्री. अर्षद काझी) *हिंगोली जिल्हा सचिव, व कार्यकारणी विभागीय उपाध्यक्ष छत्रपती *संभाजी नगर. ( श्री नाविद पठाण)*परभणी जिल्हा सहसचिव , (श्री प्रमोद गाडेकर) *स्क्रूटनी कमिटी चेअरमन, महाराष्ट्र व्हॉलीबॉल असोसिएशन ( श्री. काझी अक्रम )यांनी केले आहे.विभागीय सचिव – छत्रपती संभाजीनगरसंपर्क:सतीश पाठक सर – ९४२३७४५२५८काझी अक्रम – ८०८७६४८१४३

## स्थान निश्चिती शिबिर विद्यापीठातच आयोजित करण्याच्या निर्णयावर शिक्षक संघटनेचा तीव्र विरोध

**छत्रपती संभाजीनगर :** विद्यापीठात अध्यापकांच्या सेवांतर्गत प्रगती योजनेतील स्थान निश्चिती शिबिर वर्षातून चार वेळाच आयोजित करण्याचा निर्णय अन्यायकारक असल्याचा आरोप शिक्षक संघटनांनी केला असून, हा निर्णय तात्काळ रद्द करण्याची मागणी केली आहे. दिनांक १५ नोव्हेंबर २०२५ रोजी विद्यापीठाने निर्गमित केलेल्या पत्रानुसार स्थान निश्चिती शिबिरे फक्त विद्यापीठ स्तरावर घेण्याचे कळविण्यात आले आहे. मात्र, ८ जुलै २०१९ च्या शासन परिपत्रकात अध्यापकांचे स्थान निश्चिती शिबिर दर महिन्याला किमान एकदा आयोजित करून, त्यांना पात्र दिनांकापासून लवकरात लवकर सेवांतर्गत प्रगती योजनेचे लाभ मिळावेत, असे स्पष्ट निर्देश आहेत.

शिक्षक संघटनेने म्हटले आहे की, पूर्वीप्रमाणे जिल्हास्तरावर शिबिरे आयोजित केल्यास संस्थाचालक व शिक्षकांना सोयीचे होते. परंतु आता एका शिक्षकाच्या स्थान निश्चितीसाठी संस्थाचालकांना ४०० किमी प्रवास करून विद्यापीठात उपस्थित राहणे अवघड आहे.

तसेच विद्यापीठाबाहेरील विषयतज्ञांकडून मूल्यमापन करून घेण्याची सक्ती म्हणजे "विद्यापीठातील अध्यापकांवर अविश्वास" असल्याचेही संघटनेने नमूद केले आहे. स्थान निश्चिती समिती आधीच API तपासणी व मूल्यमापन करीत असताना, पुन्हा ५००० रुपये भरून API तपासणी करण्याची अट ही वेळखाऊ आणि अन्यायकारक असल्याचा आरोपही त्यांनी केला आहे.

संघटनेने विद्यापीठाच्या प्रशासनाला केलेल्या निवेदनात, १५/११/२०२५ चा निर्णय रद्द करावा, ५००० रुपये शुल्क रद्द करावे, स्थान निश्चिती शिबिरे पूर्वीप्रमाणे महिन्याच्या शेवटी जिल्हास्तरावर आयोजित करावीत, अशी मागणी केली आहे. यापूर्वीही प्रशासनाचे लक्ष वेधूनही निर्णयात बदल न झाल्यास संघटनेमार्फत लोकशाही मार्गाने आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारही देण्यात आला आहे. या निवेदनावर डॉ. फुलचंद सलामपुरे, डॉ. राजेश कपरे, एच.बी. सोमवंशी, प्रा. सुनील मगरे, डॉ. विलास खंदारे, डॉ. हंसराज जाधव, डॉ. पी.जी. रानमाळ, डॉ. रविंद्र भोरे, डॉ. विकास देशमुख , प्रा. संदीप पाटील, डॉ. वसंत झेंडे, डॉ. सचिन मोरे, डॉ. किशोर वाघ, डॉ. एम. डी. निकम, डॉ. बद्रीप्रसाद बिडवे, डॉ. विलास महाजन यांच्या सह्या आहेत.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार २० नोव्हेंबर २०२५


## गेवराईत कबड्डी निवड चाचणी स्पर्धा संपन्न



**बीड :** जिल्हा कबड्डी असोसिएशन बीड आयोजित कुमार गट व पुरुष खुला गट जिल्हा अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धा गुरुवार दि. २० नोव्हेबंर २०२५रोजी गेवराई येथे आय.टी.आय. च्या मैदानावर आयोजित करण्यात आल्या आहेत . या स्पर्धेचे उदघाटन गुरुवार दि.२० नोव्हेबंर २०२५ ला सकाळी ठीक ९:३० वाजता मान्यवरांच्या शुभहस्ते उद्धाटन होणार आहे. सदरील स्पर्धेत बीड जिल्ह्यातील जास्तीत जास्त क्रीडा मंडळे व कबड्डी खेळाडूंनी सहभाग घेताना राज्य कबड्डी असोसिएशन ने दिलेल्या संपूर्ण नियमाचे पालन करावे. कुमार गटातील खेळाडूंचे वयाचे प्रमाणपत्र,ओळखपत्र, वजन या सर्व गोष्टी तंतोतंत पाळाव्यात कोणतेही दस्तऐवज खडाखोड केलेले चालणार नाहीत. ज्या खेळाडूकडे राज्य असोशिएशनने घालून दिलेल्या नियमानुसार कागदपत्राची पूर्तता होणार नाही. त्या खेळाडूला स्पर्धेमध्ये खेळवले जाणार नाही. या स्पर्धेतून राज्य स्पर्धेसाठी संघ निवडला जाणार आहे. पुणे येथे भोसरी डिगी गांव येथे दि.२५/११/२०२५ रोजी होत असलेल्या ५२ कि.वजन कुमार गट राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेत आपल्या जिल्ह्याचा संघ सहभाग घेणार आहे. सदरील संघामध्ये आपले क्रीडा नैपुण्य दाखवून राज्य स्पर्धेचे नेतृत्व करण्या करिता उत्कृष्ट खेळाडूची निवड केली जाणार आहे. याची सर्व क्रिडा मंडळाने व खेळाडूनी नोंद घ्यावी. या साठी सकाळी ठीक ९:३० वाजता शारदा स्पोर्ट्स अकॅडमी गेवराई आय.टी.आय. मैदान, गेवराई या ठिकाणी खेळाडू व प्रशिक्षकांनी उपस्थित राहावे. असे अवहान बीड जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या वत्तीने कार्यवाह डॉ.विश्वास कदम यांनी केले आहे.


१ २ वी सायन्स व B.Sc. पास विद्यार्थ्यांसाठी

शासन मान्यताप्राप्त जॉबगॅरंटी कोर्सेस

DMLT — कालावधी २ वर्ष, पात्रता : १२ वी सायन्स

PGDMLT — कालावधी दिड वर्ष (३सेमिस्टर), पात्रता : B.Sc. (Microbiology, Chemistry, Botany, Zoology, Biochemistry, MLT, CLS)

X-RAY — कालावधी १ वर्ष, पात्रता : १०वी ,१२ वी पास

C.T.SCAN — कालावधी १ वर्ष, पात्रता : १०वी ,१२ वी पास

E.C.G. — कालावधी १ वर्ष, पात्रता : १०वी ,१२ वी पास

O.T. TECHNICIAN — कालावधी २ वर्ष, पात्रता : १०वी ,१२ वी पास

PG RADIOLOGY — कालावधी दिड वर्ष (३सेमिस्टर), पात्रता : B.Sc. Physics

रेडिओलॉजी — कालावधी २ वर्ष, पात्रता : १२ वी सायन्स पास

फिजिओथेरपी — कालावधी २ वर्ष, पात्रता : १२ वी सायन्स पास

ऑप्थोमेट्री — कालावधी २ वर्ष, पात्रता : १२ वी सायन्स पास

9405109103 | 8830838903


## भारतरत्न इंदिरा गांधी यांना बारवाले महाविद्यालयात अभिवादन




**जालना :** माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या १०८ व्या जयंती निमित्ताने बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयात प्राचार्य कविता प्राशर यांच्या हस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.यावेळी कु. समीक्षा कुडके या विद्यार्थिनीने इंदिरा गांधी यांच्या जीवन चरित्राविषयी माहिती दिली. इंदिरा गांधी यांनी आपल्या आपल्या कार्यकाळात जागतिक स्तरावर देशाची प्रतिमा उंचावली. त्यांनी घेतलेली अनेक निर्णय देशाच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण होते. आयुष्यभर त्यांनी या देशाची सेवा केली. त्या म्हणायच्या "मी आज जिवंत आहे, उद्या कदाचित नसेन... मी माझ्या शेवटच्या श्वासापर्यंत सेवा करत राहीन आणि जेव्हा मी मरेन तेव्हा मी म्हणू शकतो की माझ्या रक्ताचा प्रत्येक थेंब भारताला बळकटी देईल आणि त्याला बळकट करेल... जरी मी राष्ट्राच्या सेवेत मृत्युमुखी पडलो तरी मला त्याचा अभिमान असेल. माझ्या रक्ताचा प्रत्येक थेंब... या राष्ट्राच्या विकासात आणि त्याला मजबूत आणि गतिमान बनवण्यात योगदान देईल." बँकांचे राष्ट्रीयीकरण आणि बांगलादेश युद्धातील त्यांच्या नेतृत्वासह राष्ट्रासाठी त्यांच्या योगदानाचा आढावा यावेळी घेतल्या गेला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. गायत्री कोंबे यांनी केले.यावेळी शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांची उपस्थिती होती.

## महाविद्यालयाच्या विकासात श्री. आबेद चाऊस यांचे योगदान महत्त्वपूर्ण : प्रा. मोहन परजने



**पाटोदा (प्रतिनिधी) :** जय भवानी महाविद्यालयाच्या प्रशासकीय विकासात कार्यालयीन अधिक्षक श्री.आबेद चाऊस यांचे योगदान महत्तवपूर्ण आहे.असे प्रतिपादन पर्यावारणवादी विचारवंत प्रा.मोहन परजने यांनी केले. ते पाटोदा येथिल जय भवानी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित कला व विज्ञान महाविद्यालयात कार्यालयीन अधिक्षक श्री.आबेद चाऊस यांच्या सेवापूर्ती निमित्त आयोजित सेवा गौरव समारंभात प्रमुख पाहुणे म्हणुन बोलत होते.पुढे बोलताना ते म्हणाले की पाटोदा सारख्या दुर्गम भागात श्री.चाऊस यांनी प्रमाणिक कामातुन आपली ओळख निर्माण केली.एक उपक्रमशील प्रशासक म्हणुन काम केले.आदरणिय शिवाजीराव दादा व श्री.अमरसिंह पंडित यांनी टाकलेला विश्वास त्यांनी आपल्या कामातुक सार्थ करून दाखवला.त्यांच्या भावि आयुष्यासाठी शुभेच्छा! व्यक्त केल्या.या प्रसंगी व्यासपीठावर विकास समितीचे सदस्य,श्री.दिलीपराव जाधव,मार्गदर्शक प्राचार्य डॉ.विश्वास कदम सर,संस्थेचे मुख्यलेखापाल श्री.प्रताप हातोटे,सहलेखापाल प्रा.काशीनाथ गोगुले हे प्रमुख पाहुणे म्हणुन उपस्थित होते.तर अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सदाशिव सरकटे होते.सत्कार मुर्ती श्री.आबेद चाऊस सप्त्नीक संपूर्ण कुटुंबासह उपस्थित होते.तसेच समन्वयक प्रा.डॉ.सुनिल जाधव,कनिष्ठ विभागाचे प्रमुख प्रा.प्रकाश नाईकवाडे,माजी प्राचार्य डॉ.शौकत सय्यद,प्रा. डॉ.भास्कर आहिरे,प्राचार्य पठाण,श्री.शहाजी जाधव आदि मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.या गौरव समारंभाचे प्रस्ताविक विद्यापीठाच्या अधिसभा सदस्या श्रीमती डॉ.कल्पना घारगे यांनी केले.अध्यक्ष व प्रमुख पाहुण्यांच्या शुभहस्ते श्री.आबेद चाऊस यांचा संपूर्ण कपडे,सन्मानचिन्ह,शाल श्रीफळ देवून सप्त्नीक सत्कार करण्यात आला.या प्रसंगी त्यांची सून श्रीमती जरीन चाऊस व नात कु.इंशरा यांनी मनोगत व्यक्त केले.सत्काराला उत्तर देताना श्री.आबेद चाऊस यांनी माजी मंत्री आदरणीय शिवाजीराव दादाज्ञव श्री.अमरसिंह (भैय्यासाहेब )पंडित यांचे आभार व्यक्त करून.माझ्या सारख्या एका शेतकरी कुटुंबातील तरुणाला कार्यालयीन अधिक्षक सारख्या महत्वाच्या पदावर काम करण्याची संधी दिली.तेव्हा आजन्म त्यांच्या ऋणात राहीन अशी ग्वाही दिली.या प्रसंगी प्रा.डॉ.शौकत सय्यद,प्रा.डॉ.भास्कर आहिरे,प्रा.कल्याण पवार,संस्थेचे लेखापाल श्री.प्रताप हातोटे,सहलेखापाल प्रा.काशीनाथ गोगुले यांनी आपल्या भावना व्यक्त करून त्यांच्या भावी आयुष्यासाठी शुभेच्छा ! दिल्या मार्गदर्शक प्राचार्य डॉ.विश्वास कदम यांनी श्री.आबेद चाऊस यांच्या प्रशासकीय कार्याबद्दल कौतुक करून त्यांच्या भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचा एवढा मोठा सेवा गौरव समारंभ होतोय हीच त्यांच्या कार्याची पावती आहे.या शब्दात त्यांच्या कार्याचा गौरव केला.शेवटी अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ.सदाशीव सरकटे यांनी सर्वांच्या भावनांची योग्य सांगड घालून श्री.आबेद चाऊस यांच्या प्रशासकीय कामाचे अनुभव सांगितले.त्यांच्या स्वछंदी हसतमुख स्वभावामुळे त्यांनी आनेक प्राचार्याबरोबर चांगले काम केले.असे सांगून त्यांच्या सेवेचा खरा गौरव झाला असल्याचे सांगून.भावी आयुष्यासाठी शुभेच्छा..!दिल्या.या सेवा गौरव समारंभाचे बहारदार संचलन प्रा. डॉ.अशोक देवगुडे यांनी केले.तर आभार ग्रंथपाल श्रीमती प्रा.ज्योती रकटे ( कठारे ) यांनी मानले.या प्रसंगी सर्व प्राध्यापक वृंद,शिक्षकेत्तर कर्मचारी श्री.चाऊस यांची मुले,सुना,मुलगी व नातु ,आणि बहुसंख्य विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.हा सेवा गौरव समारंभ यशस्वी करण्यासाठी प्राचार्य डॉ.विश्वास कदम यांच्या मार्गदर्शनाखाली गौरव सोहळा समितीतील सर्व सदस्यांनी अथक परिश्रम घेतले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार २० नोव्हेंबर २०२५

# शिवाजी महाविद्यालयाची स्वाती निळ सी. ए. परीक्षेत उत्तीर्ण



**कन्नड :** दि. १९ नोव्हेंबर २०२५ – शिवाजी महाविद्यालयातील वाणिज्य विभागाची विद्यार्थिनी स्वाती निळ हिने सी.ए. अंतिम परीक्षा-२०२५ उत्तीर्ण करून महाविद्यालयाचा मान उंचावली आहे. सनदी लेखापाल (सी.ए.) परीक्षा ही देशातील अत्यंत कठीण परीक्षांपैकी एक मानली जाते. ग्रामीण पार्श्वभूमी असूनही स्वातीने कठोर परिश्रम, चिकाटी आणि जिद्दीच्या जोरावर आपले सी.ए. होण्याचे स्वप्न पूर्ण केले आहे.स्वाती निळ हिने चार्टर्ड अकाउंटंट अंतिम परीक्षा उत्तीर्ण केल्याबद्दल शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. एन. भोसले सर यांच्या हस्ते तिचा सत्कार करण्यात आला. प्राचार्य डॉ. भोसले यांनी स्वातीचे अभिनंदन करत तिच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.या प्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. बी. के. मगर, नॅक समन्वयक डॉ. विजय मातकर, वाणिज्य विभागाचे डॉ. मंगेश जाधव तसेच डॉ. राकेश अहिरराव उपस्थित होते.स्वातीच्या यशामुळे महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळाली असून तिच्या परिश्रमांचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

# सिल्लोडमध्ये बोलक्या बाहुल्यांद्वारे मतदान जनजागृती



**छत्रपती संभाजीनगर :** दिनांक १९.११.२०२५ रोजी नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूकी च्या अनुषंगाने स्वीप कक्ष अंतर्गत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा धोत्रा येथे कार्यरत असलेल्या शिक्षिका श्रीमती सरला कामे ह्या बोलक्या बाहुल्यांच्या माध्यमातून मनोरंजनात्मक पध्दतीने मतदान जनजागृती करत आहेत वेगवेगळ्या वार्ड व चौक,सार्वजनिक ठिकाणे येथे जावून प्रथम मतदाता व अन्य सर्व स्त्री- पुरूषांना मतदानाचे महत्व,नियम व मतदान केंद्रात मिळणारी मदत या विषयी मोठ्या प्रमाणात म्हणजे १००% मतदान व्हावे या साठी जनजागृती करीत आहे त्यांच्या सोबत त्यांचे बोलके बाहुला गंगाराम व गंगूबाई असतात जमावाने व मतदान करू असा निश्चय या वेळी मतदार बंधू भगिनींनी केला...स्वीप टीम चे प्रमुख आदरणीय श्री राजीव फुसे साहेब, तसेच स्वीप समन्वयक केंद्रप्रमुख आदरणीय श्री किशोर जगताप साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली श्रीमती सरला शामराव कामे यांनी आज सिल्लोड शहरातील विविध भागात बोलक्या बाहुल्यांच्या माध्यमातून मतदान मतदान जनजागृती केली. त्यांच्या कामाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# घामाचे संदर्भ : कामगार विश्वाची मर्मग्राही कविता




**शब्द** स्नेही सन्मित्र कवीवर्य किरण भावसार यांच्या कवितेचा मर्मग्राही अनुबंध हा कामगार विश्वाच्या जीवन जाणिवांचा प्रगल्भ सृजनशील भावनेचा स्नेहाळू भाव प्रकट झाला आहे.आजच्या काळाचे महानगरीय कामगार ते सर्वहरा सामान्य मजूर म्हणून अपर्ण पत्रिका "भूक आणि व्यवस्थेपुढे गुढगे न टेकता कष्ट आणि जोखीम खांद्यावर पेलून परिस्थितीशी झुंजणाऱ्या हरेक कष्टकऱ्यास" कामगार हा खरंच कधीचं कुणाच्या खिजगणतीतही नसतो.त्याचं मरणही नसते हजेरी पटावरही"कारखान्यात झालेल्या भीषण स्फोटात दोन मृत्यू "एवढीच आली बातमी.त्याचं नावं ही नव्हतं हजेरी पटावर.. तुमच्या आमच्या सारखाच कुणी कपडा मारणारा,टेबल साफ करणारा हाॅटेलातला 'पोऱ्या'ही तो आलेला असतो काहीतरी करुन दाखण्याच्या इच्छेने.पण कुणीच करीत नाही त्याची कदर.तसचं अचानक बंद पडावा कारखाना आणि त्याच्या हातचं कामं गेलं.मन काचावं तसा हातचं मांज्या ने रक्ताळावा.ही सारी वेदना मुखर करतांना कवी झापड बांधून घ्यावी डोळ्यांवर पण मनाचा तान कमी होत नाही म्हणून कवितेनेचं भरावी मनाची जखम.'ईसीजीच्या रेषा सारखं..उमटावं मनाच्या कागदावर..'कविता कशी इमाने इतबारे येते.तुकोबाशी संवाद करते.तुकोबा जसे तल्लीन झाले होते.अगदी तसेच शब्दांच्या सच्चाईत कवी लिहितो,"शब्दात रमलेला मी सुखी आहे घामाच्या पैशात कवी कुळाला कसा लावू बट्टा?सांगा तुकोबा"....(पृष्ठ 17)ही कविता निस्सीम कामगार भक्तीची नितीची कविता आहे.राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या ग्रामगीतेचा अर्पण अनुबंध असा आहे की, श्रमिकांच्या कष्टाच्या घामाला प्रतिष्ठा मिळावी.सर्वांचे लक्ष तुझ्या कष्टाकडे असावे.यातच खरी मानवतेची झळाळणारी तेजस्वीता असेल.या श्रमिकांच्या व्यथा वेदनांवर हळुवार फुंकर ही कविता घालते.कारण किरण भावसार हे या विश्वाचे प्रतिनिधी आहेत.जसे,'यांत्रिक पशू वगैरे,जुणे दिवस आठवून,मी औकात विसरत नाही, घराला पेलत नाही सन्मान चिन्हाचे ओझे,शाली,श्रीफळ हे सारे सन्मान घेऊन कवी कधीचं करीत नाही मोठेपणा.पुरस्काराने अंघोळ करून तो कामावर जातो अवमान सहन करण्यासाठी.. हिचं खरी श्रमाची शिदोरी..ही कविता कवीच्या सृजनशील भावनेचा ओलावा देऊन जाते.कामगार विश्वाची आजची दुनियादारी अतिशय तरलतेने कवीने व्यक्त केली आहे.या महानगरीय जगण्यातील कामगार आणि त्यांच्या 'घामाचे संदर्भ' कचरा गोळा करणारी स्त्रिया,भंगारवाला, गिरणी कामगार,ड्रायव्हर, ऊसतोड कामगार, कंपन्यात जड काम करणारे, दुसऱ्या राज्यातून आलेला गुरखा,त्याच्या कामगार म्हणून वेदना प्रचंड वेदना देऊन जाते.यांत्रिक पशू वगैरे, यंत्राच्या दुनियेतील अनेक मुलखातून आलेले बिनचहेऱ्याचे माणसं घाण्याच्या बैलासारखी.ही बाराच्या भावात जगणारी माणसं.रोजनदारी, बेरोजगारी,अनिश्चितेची टांगती तलवार, पर्मनंट हा शब्द जगण्याला दाद देणारा,कवीला जुने दिवस आठवून,'राबणाऱ्या हातांची उपासमार बघतांना मला का होता येत नाहीये त्यांच्या रिकाम्या ताटातली भाकर?..जुने दिवस आठवून..रात्रपाळी,'आयुष्य म्हणजे फक्त तीन शिफ्ट कि?'रोषणाई, दिवाळीच्या उजेडाच्या भरवशावर भंगार गोळा करणारा कामगार आपल्या लेकरा बाळाच्या डोळ्यात कोणतं सुख देतं असेल.?साॅलोमन ग्रेंडीची कीव करावी फक्त या कवितेमधून"हेल्याचा हेलपाटा होऊन कमी करतात भूईचा भार,एक दिवस साॅलोमन ग्रेंडी.ही कामगारांची चितरकथा वेदना देऊन जाते.आजच्या यंत्रयुगाचा काळ 'जेसीबी,पोकलेन,हे अजस्त्र यंत्र आले.गाढव नष्ट झाली, बैलांच्या मानावरचं जू गेलं.पुर्वी गोऱ्हा ठेसून बैल करणे 'इथं काम प्यारं असतं बाबांनो!' नेमकं या कृषीप्रधान देशात बेकारांच्या झुंडी यंत्राने केली त्याची खुर्मुंढी."कुणाच्या विझू नयेत चुली,कष्टणाऱ्या हातातलं काम हिरावून घेऊ नये कुणी,माणूस रहावा जिवंत बाकी यंत्र युगाचा विजय असो!"(पृष्ठ 33) 'महागाई'चीवेदना कवीने मुखर केली आहे.बालपण ते आताचे दिवस हा बंदा रुपया कवीला बैलगाडीच्या चाका सारखा वाटणे,तोळाभर रुपयाचा चोळामोळा होऊन तोळामासा झाले, बालपणीची नाणी चव्वाणी आता दिसतं नाही.हेमोल अनमोल झाले आहे.तर पाठीवर सिमेंटच्या गोण्या वाहणाऱ्या श्रमिकांची 'वेदना' त्याची पाठ इतकी मेहनतीने टणक झाली.पण नातवाला पाठीगुळी घेताना तो हळूवार स्पर्श मनमोहक मोरपिसाचे सुख देते.हातगाड्यावर भंगार गोळा करणारा श्रमिक हारत नाही"उकिरड्याचे ही पांग फिटतातच!"हा आशावाद व्यक्त केला आहे.श्रमिक आहे म्हणून हे जग आहे.बेभरोशाच्या कुणबीकीत पिकलं नाही विकलं टिकलं नाही.म्हणून आत्महत्या करायची नाहीतर, कंपनीत जाऊन रोजंदारी करु,असे आश्वासक कविता कवी किरण भावसार देतात.'बेईमान है बडा'पोटा पाण्यासाठी पाण्यात भिजून गेलो काय आलो काय कष्ट करीत राहणे.मोबाईल तेवढा भिजलानाही पाहिजे.मोकळी हवा,निरभ्र आकाश या साऱ्या गोष्टी सोडून शहराच्या गजबजाटात तो कामगार आलाय.आजारी पडला तर तो नाही टिकू शकतं या महागड्या दवाखान्याच्या गर्तेत.भोंग्याचा आवाज हे त्यांच्या जगण्याचं सुख.कवी सुर्वे मला माफ करा!"शिक्षण कंत्राटी,काम कंत्राटी,जगणं कंत्राटी,आख्खा देश कंत्राटी कसा पेलावा सुर्वे या कंत्राटी आयुष्याचा भारमाफ करा पण...तुम्ही हवे होतात सुर्वे आज"(पृष्ठ 49)या कविते प्रतिमाअतिशय मनस्वी आहेत.जसे,'हँग झालेल्या आमच्या मेंदू कोण पेरील आता तुमच्या सारखे झोतभटीतल पोलादी विचार'.'आयुष्यभर गाडी चालवून ही पोहचला नाही घरी आपल्या माणसांत तो कापत राहिला रस्ता' ही सल अत्यंत मन व्याकूळ करते.'भैय्ये'दुसऱ्या राज्यातून इथे पोट भरायला आलेले.किन्नर,वेटर,राखणदार,सळाया उचलणारे प्रपंच अपमान सहन करतात."शेवटी लाचार असते भूक."रोजंदारीवर निघालेल्या बाया" घराचा गोवर्धन,दुखाच्या भेगा लिपून,आंबाड्यात गरीबी माळून,सेल्फ डेसिव्ह स्टिकर, वेदनेची टिकली,कटिंग, पॅकिंग,स्विपिंग या कामात सकाळाचा नट्टापट्टा घामात निथळून जातो.हे सारं वाचलं की ही कविता काळजाचा ठाव घेते.रस्त्याच्या कडेला पाल टाकून"दैवाला फाट्यावर मारून दगडाला आकार देणारा.छन्नी हातोड्याच्या गजरात देव बनवला की तो जातो मंदिरात.रोज आरती घेतो.पणसहज जन्मदात्याला विसरतो.ते घडवितात नशीब दगडाचेकापड दुकानात काम करणार नवं तरुण तो अनेकांचे बस्तेबांधून देतो.हा बिनलग्नाचा राहतो.वय उलटून गेलेला सदाफाटत राहतो.ओझं,भूक,गुरखा या कवितेनं समकालीन वास्तवाचे सजग भान दिले आहे.शेकडो मैलाहून आलेला गुरखा इमाने इतबारे चाकरी करतो."कुठला बोनस कुठली बिदागी, कुठलं घरं, कोणत्या सवलती शिवाय शेवटी तो परकाच तो!"(पृष्ठ 78) आता साऱ्याचं नी सगळ्याच गोष्टी ब्रॉण्ड म्हणून विकल्या जातात.गल्ली बोळीतले शिंपी देशोधडीला लागले, भाजीपाला माॅल चकचकीत मार्केट,अमुक ब्रेंड तमुक ब्रेंड नावाने खपविल्या जातो.पस्तीस मिनिटांत पिझ्झा घरी, मायाळू भाकरी ला नुडल्सची टस्सल.या साऱ्यात खरंच आता माणुसकीचा ब्रेंड ही विकतं भेटेलं.ही यंत्रयुगाची अस्सल कविता आहे.पिझ्झाडिलेव्हरी करणारा मुलगा,भूकेला नसतो टाइम टेबल, घामाचे संदर्भ ठरलेच नाही कुचकामी,कवितेला श्रम सार्थकी संघर्षाचा दिप लावून ही कविता आली आहे.राबणाऱ्या हातात भोवती रहाणारी,घामाचा वास हे वास्तव या कवितेचे आहे.कष्टकऱ्यांच्या बाजूने उभी राहणारी ही कविता आहे.'ते कृतघ्न नाहीत' कामगार विश्व नव्याने ओळख उजागर करणारी ही कविता."माफ करा पण ते कृतघ्न नाहीत' भांबावून गेलेत,भाकरीशी थांबलेली त्यांची लढाई, शिक्षण प्रबोधनाकडे कशी नेता येईल?हाच आजचा प्रश्न आहे.त्यांच्याही वस्तीत सूर्य उगवायलाच हवा"(पृष्ठ 107)एक निस्सीम करुण्याता व्यक्त होताना दिसते हेच नेमके या कवितेचे निर्लेप नितळ श्रेध्दय विश्व यातून प्रकट होते.या कवितेने कामगार मनाचा तळं ढवळून काढला आहे."ही कविता कामगारांची विविध रूपे व त्यांच्या दयनीयतेचे भीषण वास्तव आपल्या कवेत घेते.कचरा वेचणाऱ्या स्त्रीया,भंगारवाला, गिरणी कामगार, ऊस तोड कामगार,आदी कामगारांची काव्यगत कथने, कामगारांच्या कष्टकऱ्यांच्या शोषणांचा इतिहास वर्तमान वाचकांच्या पुढ्यात ठेवतात. बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या ब्रेंडयुध्दात छोटे व्यावसायिक व कुशल कारागीर यांच्या धंद्यांसगट उध्वस्त होतं असल्याची सल,जागतिकीकरणातील अगतिकीकरण दाखविणारा आहे.ही कविता कामगारांच्या योगदानाबद्दल लक्षवेधी सुवाच्य करते "अशी चिंतन चिकित्सक पाठराखण साक्षेपी समीक्षक प्रा डॉ अरूण ठोके यांनी केली आहे.प्रदिप खेतमर याचे लक्षवेधी मुखपृष्ठ आहे.कवी किरण भावसारयास हार्दिक शुभेच्छा.

घामाचे संदर्भ:-(कवितासंग्रह)
कवी:-किरण भावसार
प्रकाशक:-विष्णू जोशी काव्याग्रह प्रकाशन,वाशिम
मुखपृष्ठ:-प्रदीप खेतमर, पुणे
प्रथमावृती:-१ जानेवारी २०२५
किंमत:-१६०/रुपये



पुस्तक परिचय:- डॉ प्रभाकर शेळके, जालना
संपर्क:-९९७५१३७३३७

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार २० नोव्हेंबर २०२५



प्रवेश सुरू

डी.एम.एल.टी.

P.G.DMLT

फिजोओथेरिपी

डिप्लोमा ऑप्थोमेट्री

OT टेक्नीशियन

X-Ray, ECG

रेडीओलॉजी

संपर्क

9405109103


## खादाड मनीमाऊ

एका घरात राहायची
एक मनीमाऊ
अंगात होती गलेलठ्ठ
भारी खादाडखाऊ

तिच्या एका मैत्रिणीने
वाढदिवसाचे केले आयोजन
मनीमाऊलाही मिळाले
कार्यक्रमाचे निमंत्रण

वाढदिवसाच्या दिवशी
विविध पदार्थांची मेजवानी
खिर पाहून मनीमाऊच्या
तोंडाला सुटले पाणी

गोड खिर खाण्याची
भारी सुटली हाव
डोळे मिटून तिने
चांगलाच मारला ताव

अधाशीपणे खिर खाल्याने
पोट लागले दुखायला
जोरजोराने रडून
खाली लागली लोळायला

घाईघाईने तिथे
बोके डाक्टर आले
मनीमाऊला तपासून
कंबरेत इंजेक्शन दिले

औषध देत डाक्टर म्हणाले
प्रमाणशीर खावे गोड
खादाड मनीमाऊची
चांगलीच मोडली खोड




**- रवींद्र चालीकवार**
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.९०११५५९१०६


# इंदिरा गांधी जयंती उत्साहात साजरी



**छत्रपती संभाजीनगर :** ज्ञानेश्वर विद्यालयात डॉ. संध्या मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम संपन्नछत्रपती संभाजीनगर: भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांच्या जयंतीनिमित्त ज्ञानेश्वर विद्यालयात एका विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. हा कार्यक्रम डॉ. संध्या मोरे यांच्या बहुमोल मार्गदर्शनाखाली मोठ्या उत्साहात पार पडला. कार्यक्रमाची माहिती * प्रमुख मार्गदर्शन: डॉ. संध्या मोरे * सूत्रसंचालन व मार्गदर्शन: श्रीमती शरयु बोरगावकर * आभार प्रदर्शन: श्री. भरत झोडपे मान्यवरांची उपस्थितीयावेळी विद्यालयाचे पर्यवेक्षक श्री. संभाजी तांगडे आणि ज्येष्ठ शिक्षिका श्रीमती मंगल पवार यांची विशेष उपस्थिती लाभली. उपस्थितांचे योगदानकार्यक्रमासाठी सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती, ज्यामुळे या कार्यक्रमाला अधिक शोभा आली. श्री भरत झोडपे यांनी उपस्थितांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली. हा प्रेरणादायी कार्यक्रम इंदिरा गांधींच्या कार्याची आठवण करून देणारा ठरला!

# ग्रामीण आरोग्याचा समाजशास्त्रीय प्रवास : सर्वसमावेशक आणि सशक्त भारताची पायाभरणी

भारताच्या विकासाच्या वाटचालीत ग्रामीण समाज हा कणा मानला जातो. देशाच्या एकूण लोकसंख्येपैकी दोन-तृतीयांश लोक अजूनही ग्रामीण भागात राहतात. अशा समाजाची प्रगती ही केवळ आर्थिक उत्पादनात कशी वाढ होते यावरच अवलंबून नसते, तर त्यांच्या आरोग्यस्थितीची गुणवत्ता कशी आहे, आरोग्यसेवा किती उपलब्ध आहे, सामाजिक सुरक्षितता किती मजबूत आहे आणि लोकांना त्यांच्या मूलभूत हक्कांबद्दल किती जागरूकता आहे, यावरही अवलंबून असते. ह्याच वास्तवाच्या प्रकाशात दरवर्षी नोव्हेंबर महिन्याच्या तिसऱ्या गुरुवारी साजरा केला जाणारा 'राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य दिन' महत्त्वाचा ठरतो. या वर्षी 20 नोव्हेंबर रोजी साजरा होणारा हा दिवस ग्रामीण आरोग्य व्यवस्थेतील अडचणी, संधी, नवीन उपक्रम आणि आरोग्य क्षेत्रातील सामाजिक असमानता यांवर चर्चा करण्याची संधी देतो. समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून ग्रामीण आरोग्य म्हणजे केवळ वैद्यकीय सेवांचा विषय नाही; ते समाजरचनेचे, सामाजिक मूल्यांचे, आर्थिक परिस्थितीचे, स्त्री-पुरुष संरचनेचे, सामाजिक न्यायाचे आणि शासनव्यवस्थेच्या कार्यक्षमतेचे व्यापक प्रतिबिंब आहे.ग्रामीण आरोग्याच्या इतिहासाकडे पाहिले तर स्वातंत्र्यानंतर देशाच्या सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेचा पाया 'प्राथमिक आरोग्य केंद्रां'तून घातला गेला. ग्रामीण जनतेच्या आरोग्य समस्यांकडे लक्ष देण्यासाठी उपकेंद्र, प्राथमिक केंद्र, तालुका रुग्णालये, जिल्हा रुग्णालये अशी शासकीय पातळीवरील रचना अस्तित्वात आली. मात्र, संरचना उभी राहिली तरी लोकांपर्यंत सेवा किती पोहोचली, या प्रश्नाचे उत्तर मात्र नेहमीच सकारात्मक नाही. अनेक दशकांपासून ग्रामीण भागातील आरोग्यसेवांची कमतरता सुस्पष्ट आहे. डॉक्टरांची अनुपलब्धता, प्रशिक्षित कर्मचारी नसणे, औषधांची कमतरता, रुग्णवाहिकांची अनुउपलब्धता, दळणवळणातील अडथळे, कमी शिक्षण आणि गरिबी यामुळे आरोग्याच्या मूलभूत सेवांपासून ग्रामीण जनता अनेकदा वंचित राहते.समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून आरोग्य म्हणजे 'आजार नसणे' एवढेच नाही, तर आरोग्य व्यक्तीच्या सर्वांगीण कल्याणाचा विषय आहे. ग्रामीण समाजात आरोग्याच्या रूग्णतेला आणि आरोग्यसेवा वापरण्याला अनेक सामाजिक घटक कारणीभूत असतात. जातिनिहाय व्याप्त असमानता, जमीनधारणेतील विषमता, महिलांची दुय्यम सामाजिक अवस्था, अंधश्रद्धा, कुपोषण, बालविवाह, स्वच्छतेचा अभाव आणि लोकांमध्ये आरोग्य शिक्षणाची कमतरता या समस्या आरोग्य व्यवस्थेच्या सुधारणेला अडथळा ठरतात. ग्रामीण महिलांच्या आरोग्याचा विचार केला तरी त्यांच्याकडे आरोग्यासाठी स्वतंत्र निर्णयक्षमता नसते. कुटुंबातील घरगुती आणि कृषी कामाचा प्रचंड भार, प्रसूतीनंतर योग्य काळजी न मिळणे, कुपोषण, आणि मासिक पाळीविषयी असलेली गुप्तता या समस्या आजही गंभीरपणे समोर येतात. त्यामुळे आरोग्य हा विषय वैद्यकीय पेक्षा अधिक समाजशास्त्रीय बाजू घेऊन येतो.राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य दिन आपल्याला या असमानतेच्या मूळ कारणांकडेही विचार करण्यास प्रवृत्त करतो. ग्रामीण समाजात आर्थिक असमानता ही आरोग्यासाठी सर्वात मोठी अडचण ठरते. अल्पभूधारक शेतकरी, भूमिहीन मजूर, तात्पुरते काम करणारे हातमजूर, हंगामी स्थलांतर करणारे कामगार, आदिवासी समाज या सर्वांना आरोग्याच्या सुविधांचा वापर करणे अधिक कठीण जाते. त्यांच्या उत्पन्नाची अस्थिरता आणि दररोज मिळणाऱ्या मजुरीवर चालणारे जीवन हे त्यांना मोठ्या आजारांचे खर्च पेलू देत नाही. आरोग्य विम्याबद्दलच्या योजनांची जागरूकता कमी असल्याने सरकारी योजना लोकांपर्यंत पोहोचतच नाहीत.अजूनही ग्रामीण भारतात औषधोपचारापेक्षा झटपट इलाज मिळवण्यासाठी लोक पारंपरिक उपचारपद्धतींकडे वळतात. अंधश्रद्धा, जादूटोणा, झाडफूंक, गावातील भोळेपणा, सामाजिक दडपण, चिकित्सकांवरील अविश्वास या कारणांमुळे आजारांचा वेळीच उपचार होत नाही. आरोग्याचे सामाजिक निर्धारक घटक शिक्षण, स्वच्छ पाणी, स्वच्छता, पोषण, आर्थिक स्थैर्य यांची उपलब्धता नसल्यास कोणतीही आरोग्य योजना समाजावर दीर्घकालीन परिणाम करू शकत नाही. सरकारचे 'स्वच्छ भारत अभियान', 'उज्ज्वला योजना', 'राष्ट्रीय आरोग्य अभियान', 'जनआरोग्य योजना' अशा उपक्रमांचे उद्दिष्ट ग्रामीण समाजाचे आरोग्य सुधारण्याकडे आहे; मात्र या योजनांच्या परिणामकारकतेसाठी समाजातील असमानता आणि सामाजिक प्रतिबंध दूर करणे अधिक आवश्यक आहे.ग्रामीण आरोग्य व्यवस्थेत आशा (ASHA) कार्यकर्त्यांचे योगदान विशेष महत्त्वाचे आहे. समाजाच्या प्रत्येक कुटुंबाशी संपर्क ठेवून गर्भवती स्त्रियांचे निरीक्षण करणे, बालकांचे लसीकरण करणे, आरोग्यविषयक जनजागृती करणे, पोषणाविषयी मार्गदर्शन करणे, क्षयरोग, मलेरिया, कुपोषण यांसारख्या आजारांची माहिती देणे अशा अनेक जबाबदाऱ्या त्या पार पाडतात. या आशा कार्यकर्त्या ग्रामीण आरोग्य आणि शासनव्यवस्था यांच्यामधील दुवा मानल्या जातात. त्यांचे कार्य समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून ग्रामीण महिलांच्या सक्षमीकरणाचेही द्योतक आहे.ग्रामीण भारतातील आरोग्यविषयक आव्हानांची चर्चा करताना 'आदिवासी समाजा'चा मुद्दा अधिक महत्त्वाचा ठरतो. भौगोलिकदृष्ट्या दुर्गम भाग, दळणवळणाची कमतरता, जंगलातील वास्तव्य, आरोग्य सुविधांपासून दुरावा, शिक्षणाचा अभाव, गरीबी, पारंपरिक जीवनशैली, पोषणाची कमतरता, अंधश्रद्धा या सर्व कारणांमुळे ग्रामीण भागातील आणि विशेषतः आदिवासी भागातील आरोग्य समस्या अधिक तीव्र आहेत. क्षयरोग, मलेरिया, कुपोषण, बालमृत्यू, मातामृत्यू दर या समस्या आजही गंभीर स्वरूपात दिसतात. त्यामुळे ग्रामीण आरोग्य सुधारण्यासाठी सर्वात प्रथम आदिवासी आणि अत्यंत वंचित गटांवर विशेष लक्ष देणे आवश्यक आहे. ग्रामीण आरोग्य दिन साजरा करताना आपल्याला आरोग्याच्या पायाभूत सुविधांबद्दलही बोलावे लागेल. प्राथमिक आरोग्य केंद्रे ही ग्रामीण आरोग्य धोरणाची पहिली पायरी असली, तरी अनेक ठिकाणी ही केंद्रे कर्मचारीअभावी कार्य करू शकत नाहीत. डॉक्टर असले तरी तज्ञ डॉक्टरांची कमतरता मोठी आहे. काही ठिकाणी औषधे उपलब्ध नाहीत, निदान सुविधा अपुऱ्या आहेत, तर काही ठिकाणी इमारती आहेत पण उपकरणे नाहीत. हे चित्र बदलायचे असेल तर आरोग्य क्षेत्रात अधिक निधीची गुंतवणूक, लोकाभिमुख धोरणे आणि स्थानिक स्तरावर आरोग्य व्यवस्थापनातील पारदर्शकता आवश्यक आहे.डिजिटल हेल्थ आणि टेलिमेडिसिन ही नवीन संधी ग्रामीण आरोग्य व्यवस्थेला बळ देऊ शकते. मोबाईल नेटवर्क, डिजिटल कनेक्टिव्हिटी आणि इंटरनेट सुविधांचा ग्रामीण भागात जलद प्रसार झाल्याने डॉक्टरांशी ऑनलाइन सल्लामसलत करणे शक्य होत आहे. तरीही या संधीचा पूर्ण लाभ घेण्यासाठी डिजिटल साक्षरता, तांत्रिक पायाभूत सुविधा आणि नेटवर्क सेवा सुधारण्याची गरज आहे. आरोग्य शिक्षण हा ग्रामीण आरोग्याचा सर्वात महत्त्वाचा पाया म्हणता येईल. लोकांना आरोग्यविषयक माहिती मिळाल्यास ते स्वतःच्या आरोग्याबद्दल अधिक सजग होतात. लसीकरण, स्वच्छता, पोषण, स्त्रीआरोग्य, बालआरोग्य, मानसिक आरोग्य या विषयांवरील जनजागृती ही आरोग्य सुधारण्याची कळीची रणनीती आहे.ग्रामीण आरोग्य व्यवस्थेतील सामाजिक न्यायाचा मुद्दाही दुर्लक्षित करता येत नाही. समाजात जात, वंश, आर्थिक वर्ग, लिंग अशा विविध आधारांवर लोकांमध्ये निर्माण होणाऱ्या असमानतेचा थेट परिणाम आरोग्याच्या उपलब्धतेवर होतो. समाजशास्त्रीय अभ्यासातून असे दिसून येते की वंचित समाजातील लोकांना आरोग्य सेवांसाठी अधिक अडचणींचा सामना करावा लागतो. त्यामुळे आरोग्य धोरणांची आखणी करताना सामाजिक न्यायाच्या तत्त्वाचा योग्य वापर करणे हे शासनाचे महत्त्वाचे कर्तव्य ठरते.आरोग्य आणि पर्यावरणाचा संबंधही

ग्रामीण समाजात महत्त्वाचा आहे. शुद्ध पाण्याची उपलब्धता, शौचालये, कचरा व्यवस्थापन, स्वच्छ हवा, सुरक्षित निवासस्थान, शाश्वत शेती पद्धती यांचा आरोग्यावर थेट परिणाम होतो. हवामान बदलामुळे उद्भवणाऱ्या नवीन रोगांची जोखीमही ग्रामीण भागात अधिक आहे. त्यामुळे आरोग्याचा विचार करताना पर्यावरण संवर्धन आवश्यक बनते.राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य दिन हा केवळ आरोग्यसेवा व्यवस्थेचा आढावा घेण्याचा दिवस नाही; तर तो ग्रामीण समाजाच्या समृद्धीच्या, सामाजिक समतेच्या, मानवाधिकारांच्या आणि सर्वसमावेशक विकासाच्या दिशेने वाटचाल करण्यासाठी प्रेरणा देणारा दिवस आहे. मजबूत आणि कार्यक्षम ग्रामीण आरोग्य व्यवस्था असेल तरच देशाचा वास्तविक विकास घडू शकतो. आरोग्य हा प्रत्येकाचा मूलभूत हक्क आहे तो समाजाच्या सर्व स्तरांपर्यंत

पोहोचवण्यासाठी शासन, आरोग्य कर्मचारी, स्थानिक संस्था, स्वयंसेवी संस्था, शेतकरी, महिला, युवक आणि संपूर्ण समाजाने एकत्रित प्रयत्न करणे आवश्यक आहे.आज या राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य दिनानिमित्त आपण सर्वांनी एक संकल्प करूया की ग्रामीण भारतातील आरोग्यसेवा 'सर्वांसाठी, सर्वत्र आणि सर्वकाळ' उपलब्ध करून देण्याचा. समान, समावेशक आणि न्याय्य आरोग्य व्यवस्था हीच सशक्त भारताची पायाभरणी आहे. ग्रामीण आरोग्य बळकट करणे म्हणजेच राष्ट्राच्या भविष्याची आरोग्यपूर्ण वीट रचणे होय. ग्रामीण भारत निरोगी असेल, तरच भारताचा विकास खऱ्या अर्थाने सक्षम आणि शाश्वत ठरेल.




**डॉ. राजेंद्र बगाटे**
(लेखक समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत) मो. 9960103582, ईमेल - bagate.rajendra५@gmail.com